पशुचिकित्सा

# जनावरांमधील 'लम्पी' रोगाची लक्षणे आणि उपचार



डॉ. धनंजय सातपुते
(मो.नं. ९७६३९९६६५७)
प्रा. यू.ए. चादर
पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग,
आदित्य कृषी महाविद्यालय, बीड





सध्या महाराष्ट्रातील जनावरांमध्ये विषाणुजन्य 'लम्पी' या त्वचेच्या आजाराने थैमान घातले आहे. या विषाणूचे मूळ आफ्रिकेत असून त्याचा सर्वदूर प्रसार होत आहे. सदर आजाराचा देशातील पहिला प्रसार ऑगस्ट २०१९ मध्ये ओरिसा राज्यात झाला होता. त्यानंतर आजपावेतो झारखंड, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ आणि महाराष्ट्रात या आजाराचा शिरकाव झालेला आढळून आला आहे.

आपल्या महाराष्ट्रात लम्पी या आजाराचा प्रसार गडचिरोली जिल्ह्यात मार्च महिन्यापासून झालेला दिसून आला आहे. तर सद्य:स्थितीत मराठवाड्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांतील गायी- म्हशींमध्ये या आजाराची लक्षणे दिसून येत आहेत.

**प्रसार** : लम्पी हा पशूंच्या कातडीवर परिणाम करणारा एक विषाणुजन्य आजार आहे. याचा प्रसार चावणाऱ्या कीटकांपासून होत असून प्रामुख्याने गायी व म्हशींमध्ये आढळून येतो. हा विषाणू देवी या गटातील कॅप्रिपोक्स प्रवर्गातील आहे. हा आजार उष्ण-दमट वातावरणामध्ये जेव्हा चावणाऱ्या कीटकांची उदा. गोचिड, गोमाश्या, डास यांची वाढ जास्त प्रमाणात होते तेव्हा मोठ्या प्रमाणात दिसून येतो. या आजाराचा रोगदर २.४५% तर मृत्युदर १.५% पर्यंत आढळून येतो.

* मरतुकीचे प्रमाण कमी जरी असले तरी अधिक दुग्ध उत्पादन देणाऱ्या संकरित गायी, लहान वासरे यांमध्ये प्रादुर्भाव जास्त आढळून येतो.

* या आजारात दूध उत्पादन कमी होते, बैलाची काम करण्याची क्षमता कमी होते, प्रजनन, त्वचा आणि एकूणच जनावरांच्या शरीर प्रकृतीवर विपरित परिणाम होतो. औषध खर्च वाढतो, जनावराचे बाजारमूल्य कमी होऊन आर्थिक नुकसान होते.

### आजार कोणत्या प्राण्यांमध्ये होतो ?

१. गोवंशीय व म्हैसवर्गीय जनावरांमध्ये हा आजार आढळून येतो. शेळ्या व मेंढ्यांमध्ये हा आजार होत नाही.

२. वासरांत व संकरित गायींमध्ये या आजाराची तीव्रता जास्त आढळून येते.

३. प्रसार मुख्यत्त्वे माश्या (स्टोमोक्सिस) डास (एडीस) गोचिड, चिलटे (कुलिकॉईडीस) यांच्यामार्फत होतो.

४. बाधित जनावरांच्या स्पर्शानेही होऊ शकतो.

५. विषाणू संक्रमण झाल्यानंतर ते दोन आठवड्यांपर्यंत रक्तामध्ये राहतात.

६. कातडी, नाक (श्वास) डोळे (पाणी) व तोंडातील लाळेतून विषाणू बाहेर पडल्याने चारा व पाणी दूषित होऊन प्रसार होतो.

७. गाभण जनावरांमध्ये या आजाराची लागण झाल्यास गर्भपात होतो किंवा रोगग्रस्त वासराचा जन्म होतो.

८. दूध पिणाऱ्या वासरांना आजारी गायीच्या दूधातून व स्तनावरील व्रणातून प्रसार होतो.

**लक्षणे :** जनावराच्या डोळ्यांतून व नाकातून पाणी येते, लसिका ग्रंथींना सूज येते, आठवडाभर खूप ताप येतो, दुग्ध उत्पादन कमी होते, त्वचेवर हळूहळू १० ते १५ मि.मी. व्यासाच्या गाठी येतात, डोके, मान, पाय, मायांग, कास, तोंड, नाक व डोळ्यात व्रण तयार होतात, चारा चघळण्यास त्रास होतो, तसेच दृष्टी बाधित होते.

**रोगनिदान :** 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हाय सिक्युरिटी ॲनिमल डिसिजेस' भोपाळ- मध्य प्रदेश येथे व्रणाच्या रक्त व रक्तजल नमुन्याच्या RT-PCR या चाचणीचा वापर करून पक्के रोगनिदान केले जाते.

**उपचार :** विषाणुजन्य आजार असल्याने त्यास उपचार उपलब्ध नाही. पण इतर गुंतागुंत होऊ नये म्हणून लक्षणांवरून उपचार करणे आवश्यक आहे. यामध्ये प्रतिजैविके, वेदना व ज्वरनाशक- ॲन्टिहिस्टामिनिक औषधे, प्रतिकारशक्तिवर्धक जीवनसत्त्व अ व ई, तसेच त्वचेवरील व्रणांसाठी ॲन्टिसेप्टिक/फ्लायरिपेलन्ट स्प्रे यांचा वापर पशुवैद्यकीय तज्ञ यांच्या सल्ल्याने करावा.

जनावराची प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी जीवनसत्त्व अ आणि ई तसेच शक्तिवर्धक ब जीवनसत्त्व द्यावे.

आजाराच्या प्रतिबंधासाठी ४ महिने वयोगट व त्यावरील सर्व निरोगी गायी- म्हशींमध्ये गोटपॉक्स लस १ मि.लि. कातडीखाली पशुवैद्यकाकडून टोचून घ्यावी. आजारी जनावरांच्या संपर्कातील जनावरांना आयव्हरमेक्टिनचे इंजेक्शन दिल्यास रोगप्रसारास काही प्रमाणात आळा बसेल.

### रोगनियंत्रणाच्या उपाययोजना

* बाधित जनावरांना वेगळे करावे तसेच निरोगी जनावरांबरोबर त्यांना चरायला सोडू नये. त्यांना स्वतंत्र गोठ्याची किंवा जागेची व्यवस्था करावी.

* डास, माशी यांचे प्रजनन प्रभावीपणे रोखण्याकरिता गोठ्यात व गोठ्याच्या भोवती असलेल्या नाल्या, खाचखळगे स्वच्छ करावेत, नाल्या वाहत्या कराव्यात.

* कडुलिंब अर्क/ निंबोळी तेल १५ मि.लि. अथवा करंज तेल १५ मि.लि. अधिक साबण १२ ग्रॅम एक लिटर पाण्यात घेऊन जनावराच्या अंगावर त्याच्या तोंड व डोळ्यांवर जाणार नाही अशी काळजी घेऊन फवारणी करावी. तसेच निबोंळी अर्काची फवारणी गोठ्यात, दावणीत करावी, जेणेकरून डास व माश्यांचे नियंत्रण होईल.

* पशुतज्ञांच्या सल्ल्याने गोचिडनाशकाची फवारणी करावी. * रोगग्रस्त जनावराचा मृत्यू झाल्यास जनावराची विल्हेवाट शास्त्रीय पध्दतीने लावली पाहिजे. यासाठी १० फूट खोल खड्डा करून त्यात मृत जनावरास गाडून वरून चुन्याची पावडर शिंपडावी आणि खड्डा व्यवस्थित बंद करावा. ■